ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ८ एप्रिल, १९५९ | अंक १४

## विविध माहिती

**वैद्यकीय उपकरणांचा कारखाना**—मुलुंड येथें वैद्यकीय व्यवसायाला लागणाऱ्या उपकरणांचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्याच्या कामीं एका अमेरिकन कंपनीचें सहकार्य श्री. के. एम. प्रेमचंद ह्यांनीं मिळविलें आहे. कारखान्यासाठी ४४ लाख रुपये भांडवल लागेल. त्यांपैकी ७५ टक्के भांडवल अमेरिकन कंपनी पुरविणार आहे. कारखाना चालू होण्यास एक वर्ष अवधि आहे.

**गिलगिटला जोडणारा रस्ता**— पाकिस्तान सरकारनें पाकिस्तान-व्याप्त भागांतील गिलगिट ह्या ठिकाणाला जाण्यासाठी पक्का रस्ता बांधण्याचें ठरविलें आहे. हा रस्ता सिंधू नदीच्या काठाकाठानें बांधण्यांत येईल व तो २३५ मैल लांबीचा होईल. सध्यां असणारा रस्ता हिंवाळ्यांत बर्फांत बुडून जातो. रस्त्यासाठी ७५ लाख रुपये खर्च येईल.

**विजेच्या दरांत कपात**— पंजाब सरकारनें एप्रिलपासून औद्योगिक कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या विजेच्या दरांत कपात करण्याचें ठरविलें आहे. कारखाने वापरीत असलेल्या विजेवरील करहि २५ तें १५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यांत येणार आहे. विजेवरील कर १९५७ मध्यें बसविण्यांत आला होता.

**जमीनधारणेची मर्यादा**—ओरिसा सरकार एका माणसाच्या मालकीच्या जमिनीवर ३३ एकरांची मर्यादा घालणार आहे. ही मर्यादा जमिनीच्या सध्यांच्या तुकड्यांना व पुढेंहि लागू होणार आहे. बिगर-शेतकऱ्यांना जमीन विकण्यावर निर्बंध घालण्यांत येईल आणि पिकाच्या हिस्सेरशीनें जमीन कसणाऱ्यांना कायम कुळाचे हक्क देण्यांत येतील.

**प्राप्तिकर अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रारी**—एप्रिल १९५८ ते डिसेंबर १९५८ पर्यंत १९६ प्राप्तिकर अधिकाऱ्यांविरुद्ध लाचलुचपतीच्या तक्रारी करण्यांत आल्या. १८४ अधिकाऱ्यांविषयीं चौकशी करण्यांत आली. त्यांपैकी ६३ च्या बाबतींतील तक्रारी खोट्या आढळून आल्या. १२ गॅझेटेड अधिकाऱ्यांविरुद्ध खात्यातर्फे कारवाई करण्यांत आली.

**सूडान-रशिआ व्यापारी करार**—सूडान व रशिआ ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार करण्यांत आला आहे. रशिआ सूडानकडून २० लाख पौंड किंमतीचा कापूस घेणार असून त्याच्या बदला यंत्रसामुग्री, मोटारी, इत्यादि माल आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक किंमतीला देणार आहे. कराराची मुदत एक वर्षाच्या आंत वाढवितां येईल.

**परदेशी टपालाचे दर वाढले**—१ एप्रिलपासून परदेशी जाणाऱ्या टपालाचे नवे दर अंमलांत आले. बोटीनें जाणाऱ्या पत्राला आतां पहिल्या औंसाला ३३ नवे पैसे आणि त्यापुढील प्रत्येक औंसाला २० नवे पैसे पडतात. सिंगल पोस्ट कार्डाला २० नवे पैसे आणि रिप्लाय पेड पोस्टकार्डाला ४० नवे पैसे असा दर आहे. बुकपोस्टाला पहिल्या दोन औंसांना आठ नवे पैसे आणि पुढील प्रत्येक दोन औंसांना सात नवे पैसे पडतात. एअरमेलचे टपालाचे दर लवकरच जाहीर होतील.

**सौराष्ट्रांतील सहकारी साखर कारखाना**—सौराष्ट्रामधील अमरेली जिल्ह्यांत उभारण्यांत आलेल्या सहकारी साखर कारखान्याचा उद्घाटन-समारंभ नुकताच झाला. कारखाना उभारण्यास १॥ कोटी रुपये खर्च आला असून तो दरसाल ५०,००० पोतीं साखरेचें उत्पादन करील. कारखान्यामुळें ह्या भागांतील लोकांना २० लाख रुपयांचा फायदा होईल. १५,००० कामगारांना त्यांत रोजगार मिळेल.

**थंड हवेचें नवें ठिकाण**—आंध्र प्रदेश सरकारनें मेहबूबनगर जिल्ह्यांतील फरादाबाद ह्या ठिकाणीं थंड हवेचें आरोग्यप्रद केंद्र म्हणून विकास करण्याचें ठरविलें आहे. २५ वर्षांपूर्वी निझामच्या सरकारनें अशीच एक योजना आंखली होती. पण अडचणीचा मार्ग व पाण्याची टंचाई ह्या कारणांमुळें तेव्हां ती रद्द करण्यांत आली होती. आतां त्या ठिकाणाची पुन्हां पाहणी करण्यांत येत आहे.

**खनिज तेलाचा सांठा**—भारताच्या तेल आणि नैसर्गिक वायु मंडळानें शिवसागर भागांत तेलाच्या विहिरी खोदण्यास प्रारंभ केला आहे. आसाममधील तेल सांपडणाऱ्या विभागांत ४·२५ कोटी टन खनिज तेल सांपडूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. सध्यां भारताला ५० लाख टन तेल दरसाल लागतें. त्यांपैकी ४० टक्के तेल आसाममधून मिळूं शकेल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**कॅनबेरा येथील इमारत**—ऑस्ट्रेलियांतील भारताच्या राजदूतासाठी बांधण्यांत यावयाची इमारत गेल्या वर्षी पैशाच्या टंचाईमुळें तहकूब करण्यांत आली. त्याचप्रमाणें राजदूताची नेमणूकहि करण्यांत आली नाहीं. ह्या बचतीमुळें १९५७–५८ सालीं भारत सरकारचे २·१९ लाख रुपये वाचले, अशी माहिती लोकसभेंत देण्यांत आली.

**काकासाहेब कालेलकरांची हिंदीची सेवा**—श्री. काकासाहेब कालेलकर ह्यांना वर्धा येथील राष्ट्रभाषा प्रचार समितीनें "महात्मा गांधी पुरस्कार" दिला आहे. बिगर–हिंदी प्रदेशांतील विद्वानांपैकी जो कोणी हिंदी भाषेची विशेष सेवा करील, त्यास हा पुरस्कार दिला जातो.

**विजेच्या मीटर्सचा कारखाना**—चंदिगड येथें इलेक्ट्रिक मीटर्सचा कारखाना स्थापण्यास भारत सरकारनें मंजुरी दिली आहे. हिंदी व हंगेरियन सहकार्यानें कारखाना स्थापन होत आहे. ह्या कारखान्यांत दरसाल ६०,००० मीटर्स तयार होतील.

**टांकसाळींना भरपूर काम**—१९५८–५९ ह्या वर्षी कलकत्ता, मुंबई व हैद्राबाद येथील टांकसाळी दर आठवड्यास ५४ तास चालू होत्या. दर आठवड्यास ३७·५ तास, ही कामाची त्यांची नेहमींची गति असते. १, २, ५ आणि १० नव्या पैशांच्या उत्पादनांत ह्या टांकसाळी गुंतल्या होत्या. हैद्राबाद टांकसाळीनें फक्त एक नव्या पैशाचींच नाणीं पाडलीं.

**कम्युनिझमपेक्षां दारिद्र्याचा धोका अधिक**—भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. छगला ह्यांनीं अमेरिकेला उद्देशून असे उद्गार काढले कीं, "जगांतील दारिद्र्य नाहींसें करण्याचे धर्मयुद्ध अमेरिकेनें पुकारावें. ह्या कामासाठी प्रारंभीं ५,००० कोटी रुपये रतील. कम्युनिझमपेक्षा दारिद्र्य हाच जगाला अधिक मोठा धोका आहे" असेंहि ते म्हणाले.

**अमेरिकेच्या आयातींत वाढ**—गेल्या वर्षी अमेरिकेनें युरोपमधून आयात केलेल्या मालाबद्दलचा उच्चांक गांठला, असें अमेरिकेच्या व्यापारखात्यानें जाहीर केलें आहे. अमेरिकेनें आयात केलेल्या मालाची किंमत ३३० कोटी डॉलर्स झाली. सर्वांत अधिक आयात मोटारींची झाली. मोटारी ब्रिटन, फ्रान्स व पश्चिम जर्मनीमधून आयात करण्यांत आल्या.

**भ्रष्टाचार थांबविण्यासाठीं कायदा**—केरळ सरकार लांचलुचपत व भ्रष्टाचार थांबविण्यासाठीं नवा कायदा करणार आहे. सध्यांच्या कायद्यांतील कांहीं तांत्रिक दोष नव्या कायद्यांत असणार नाहींत. कायदा सर्व अधिकाऱ्यांना व मंत्र्यांना सुद्धां लागूं करण्यांत येणार आहे. अर्थात्, कायद्याला मध्यवर्ती सरकारची मंजुरी घ्यावी लागेल.

**चिनी कापडाची स्पर्धा**—आग्नेय आशिआंतील देशांकडे अलीकडे चीनमधून स्वस्त कापडाची भरमसाठ निर्यात करण्यांत येत आहे. त्यामुळें भारताच्या कापडाला जबर स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. स्वस्तपणाच्या बाबतींत चीनशी स्पर्धा करणें अशक्य असल्यानें भारताला चांगल्या दर्जाचें कापड निर्माण करूनच तग धरतां येईल असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**लागवडीसाठीं नवी जमीन**—काश्मीर सरकारनें झेलम नदीच्या कांठाची ८०,००० एकर जमीन बांधबंदिस्ती करून लागवडीसाठी नव्यानें तयार केली आहे. ही जमीन दरसाल पुराखालीं बुडत असल्यामुळें शेतीसाठी निकामी होत असे. ही बहुतेक जमीन नदीच्या गाळानें तयार झालेली असल्यामुळें अतिशय सुपीक आहे. तींत गहूं व मका चांगला होईल.



५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.
शाखा - फोर्ट · दादर · माहिम · पार्ली · पुणें · बेळगांव
महिला शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव-मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. ८ एप्रिल, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## " मेड इन इंडिया " मध्यें देशी भाग किती ?

व्यापार-उद्योग खात्याच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनीं केलेल्या पाहणीवरून असें दिसून येतें कीं, यंत्रसामुग्री आणि इंजिनिअरिंग माल ह्यांच्या उत्पादनांतील हिंदी प्रमाण आतां बरेंच वाढलें आहे. त्यांत वापरल्या जाणाऱ्या विदेशी भागांचें प्रमाण उतरलें आहे. कित्येक यंत्रें तर १००% हिंदी आहेत. चहाची यंत्र-सामुग्री, वीज वाहणाऱ्या तारांचे टॉवर्स, विजेच्या मोटारी, विजेचे पंखे व दिवे, केबल्स, बॅटऱ्या, स्विचेस, इत्यादींचा त्यांत समावेश होतो. घड्याळें, शिवणाचीं यंत्रें आणि हार्डवेअरचा माल ह्यांसहि १००% स्वदेशी म्हणतां येईल.

ज्यांतील विदेशी भागांचें प्रमाण १०% पेक्षा कमी आहे अशा मालांत रेल्वे वॅगन्स व डबे ( ९५% देशी ), बॉयलर्स, वॉटर सॉफनर्स, इ. ( ९२–९८% देशी ), फ्ल्युरोसेंट ट्यूब्ज (९५% देशी), सायकली ( ९५–९८% देशी ), झिप फासनर्स ( ९९% देशी ), प्रेशर स्टोव्ह, बॉलबेअरिंग्ज आणि फाउंटन पेन्स ह्यांचा समावेश होतो.

मशीन टूल्स, कपास कापडाच्या गिरण्यांची मशिनरी, ह्यांतील हिंदी अंशहि ९०% च्या पेक्षा ज्यास्त आहे. त्यांचें उत्पादन येत्या दोनतीन वर्षांत १००% हिंदी होईल, अशी अपेक्षा आहे.

अल्कोहोल डिस्टिलरी ( ८०% हिंदी ), साखरउत्पादनाची मशिनरी ( ८०% हिंदी ), पंप ( ९०% देशी ), ट्रॅन्सफॉर्मर्स ( ८०% हिंदी ), स्विचगिअर ( ८०% हिंदी ), हेवी ट्रॅन्सफॉर्मर्स ( ७५% हिंदी ), रेडिअल ड्रिल्स ( ८०% हिंदी ), बॉयलिंग हाऊस मशिनरी ( ८०% हिंदी ), रिंगफ्रेम्स ( ८०% हिंदी ), असें इतर कांहीं उत्पादनांचें हिंदीकरण झालें आहे. रेडिओ सेट्समध्यें आतां ६०% भाग स्वदेशी असतो. घरगुती वापराचें विजेचें साहित्य ७५% देशी असतें. टाइपरायटर ७५% देशी आहे, पाण्याच्या मीटर्समधील देशी भागांचें प्रमाण ७५% आहे, घराच्या विजेचे मीटर्स ८०% स्वदेशी आहेत.

मोटारगाड्यांतील स्वदेशीचा अंश ३६% ते ६४% असलेला आढळतो. ट्रक्समध्यें तें प्रमाण ५०% आणि जीप्समध्यें ६४% आहे. भारतांत बनविल्या गेलेल्या मोटर सायकली व स्कूटर्स ह्यांतील स्वदेशीचा भाग ४०% भरतो. ह्या सर्व वाहनांतील स्वदेशी-पणा येत्या दोन वर्षांत ८००% पर्यंत पोंचण्याची अपेक्षा आहे.

यांत्रिक उत्पादन शक्य तितक्या लवकर १००% स्वदेशी बनावटीचें असावें असें सरकारचें धोरण आहे. उत्पादनाच्या योजना मंजूर करतांना, अशा हिंदीकरणाचा कार्यक्रम उत्पादकानें आंखून तो पार पाडावा अशी तरतूद केलेली असते. त्याची प्रगति कशी होत आहे ह्याची वरचेवर छाननी केली जाते. १९५९ मध्यें, औद्योगिक मशिनरीचें भारतांतील उत्पादन ८० कोटी रुपयांचें होईल, अशी अपेक्षा आहे. त्यांपैकी सुमारें ६४ कोटी रुपयांचा भाग पूर्णपणें हिंदी बनावटीचा असेल, असा अंदाज आहे. कांहीं महत्त्वाचा कच्चा माल अद्याप भारतांत तयार होत नाहीं, पण जो उत्पादनांत वापरावा लागतो, तो वगळूनच हिंदी अंशाचीं वरीलप्रमाणें दिलेलीं आहेत.

---

## योजनाकारांपुढील पेंच

### एका इंग्रज पत्रकाराचे विचार

" 'पंचवार्षिक योजना' आतां खेड्यापाड्यांतून रामायण आणि महाभारत ह्यांच्याइतकी लोकांच्या परिचयाची झाली आहे. विजेचे प्रचंड खांब आणि वाऱ्यानें डोलणारीं धान्याचीं कणसें ह्यांच्या शेजारीं उभे असणाऱ्या शेतकऱ्यांचीं रंगीत चित्रें जिकडेतिकडे आढळतात. भारतांत इतर कुठेंतरी औद्योगी-करण चालू असल्याच्या गोष्टी हे खेडूत शांतपणें ऐकून घेतांना पाहिले, म्हणजे नवल वाटतें. त्यांच्या मुलांना व नातवांना त्यामुळें चांगले दिवस पहायला मिळतील, हें ऐकून त्यांचें समाधान झालेलें दिसतें. भारतामध्यें शांतता नांदत आहे, ह्याचें रहस्य ह्या संतुष्टपणांतच आढळतें.

" भारतीयांची वृत्ति समाधान मानणारी थोडी कमी असती आणि सुधारणेसाठी आतुर असती, तर भारताची प्रगति अधिक झपाट्यानें होईल, असा विचार मनांत येतो. भारताच्या उद्धाराच्या योजना आंखणाराचेविषयीं सहानुभूति वाटते. नव्या गरजा निर्माण करून, नव्या संघटना लोकांवर लादून, खेड्या-पाड्यांच्या परंपरागत आळशी समाधानी वृत्तीला धक्का द्यावयाचा, का शेतकऱ्यांमध्यें नव्या गरजा आपोआप उत्पन्न होण्याची वाट पहावयाची, त्या पार पाडण्याची त्याला शक्ति प्राप्त होई-पर्यंत स्तब्ध रहावयाचें, असा योजनाकारांपुढें पेंच आहे. आशियांत, ह्या दोघांपैकी एकच गोष्ट शक्य आहे; दोन्हींच्या मधून मार्ग काढतां येणें गेल्या ११ वर्षांत भारताला शक्य झालें नाहीं, ह्यांत मग आश्चर्य नाहीं. "

---

## पोलादाचे कारखाने व ते चालविणारे तज्ज्ञ

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतामधील पोलादाच्या कारखान्यांतून ६० लाख टन पोलाद तयार कर-ण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमांत उत्पादनाचें उद्दिष्ट एक कोटी टनांचें ठेवलें जाण्याची शक्यता आहे. मोठ्या प्रमाणावर पोलादाचें उत्पादन करणारे जे कारखाने उभारण्यांत येत आहेत, त्यांच्याकरवीं हें उद्दिष्ट गांठण्यांत यावयाचें आहे. चीनमध्यें ज्याप्रमाणें छोट्या पोला-दाच्या भट्ट्या उभारण्यांत आल्या आहेत त्याप्रमाणें भारतांत उभारतां येतील काय, ह्याचा अभ्यास करण्यासाठी भारताचें प्रतिनिधिमंडळ चीनच्या दौऱ्यावर गेलें आहे. अशा छोटेखानी भट्ट्या उभारण्यांत आल्यास त्यांचें उत्पादन होईल तें वेगळें. भिलाई, दुर्गापूर व रूरकेला येथील कारखान्यांची पोलादाची उत्पादन-क्षमता १९६१ ते १९६६ चे दरम्यान दुप्पट करण्याचा विचार चालू आहे. तसें करण्यांत आल्यास आणखी २० ते

३० लाख टन पोलाद ह्याच कारखान्यांतून मिळूं शकेल. १ कोटी टनांचें उद्दिष्ट गांठण्यासाठी लागणारें उरलेलें उत्पादन बोकॅरो येथें उभारण्यांत यावयाच्या चवथ्या कारखान्यांत होईल अशी अपेक्षा आहे. बिहारमधील ह्या कारखान्याच्या कामाची प्राथमिक तयारी करण्यांत येत आहे. बोकॅरो येथील कारखान्याच्या उभारणीच्या कामीं जपानकडून सहकार्य मिळण्याची शक्यता आहे. पण त्या बाबतींत जपानकडून अद्याप प्रत्यक्ष कांहीं सूचना आलेल्या नाहींत. तथापि एवढें निश्चित की, पहिले तीन कारखाने उभारतांना जितक्या परदेशीय साह्याची जरूरी लागली तितकी चौथ्या कारखान्याच्या वेळीं लागणार नाहीं. कारण, पोलाद कारखान्यांच्या उभारणीच्या कामांत आतां भारतीय तज्ज्ञ अनुभवी झाले आहेत.

पोलादाचे कारखाने उभारल्यावर ते चालविण्यासाठी तज्ज्ञ एंजिनिअर्स व कुशल तंत्रज्ञ कामगार ह्यांची आवश्यकता लागते. अशा प्रकारचे आणखी १०० एंजिनिअर्स शिकवून तयार करण्यासाठी अमेरिका आणि भारत ह्यांच्या दरम्यान सध्या वाटाघाटी चालू आहेत. त्यांना अमेरिकेंत नऊ महिने शिक्षण घ्यावें लागेल. त्यांचा प्रवासाचा खर्चच फक्त भारताला द्यावा लागेल. बाकीचा खर्च अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशन व अमेरिकेचें सरकार करणार आहे. भारतांत सार्वजनिक मालकीचे तीन कारखाने आहेत. त्या प्रत्येकाची व्यवस्था पाहण्यासाठी ६७० तज्ज्ञ एंजिनिअर्स व वरिष्ठ तंत्रज्ञ ह्यांची आवश्यकता लागेल. त्याशिवाय प्रत्येक कारखान्यासाठी ६,३०० कुशल कामगारहि लागतील. हीं सर्व माणसें शिकवून तयार करण्याची एक योजना ह्यापूर्वीच हातीं घेण्यांत आली आहे. प्रत्येक कारखान्याचे विभाग उत्पादनासाठी जसजसे सिद्ध होतील तसतसे ते ह्या शिक्षित माणसांकडे चालविण्यासाठी देण्यांत येतील. रशिआंतील पोलादाच्या कारखान्यांत शिक्षण घेण्यासाठी २५६ एंजिनिअर्स पाठविण्यांत आले होते. त्यांपैकी २२१ अभ्यासक्रम संपवून परत आले आहेत. रुरकेला व दुर्गापूर येथील कारखान्यांतील ११० एंजिनिअर्स अमेरिकेहून शिक्षण घेऊन परत आले आहेत. आणखी १०० एंजिनिअर्स अमेरिकेंत शिक्षण घेत आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ब्रिटनहून २०० हिंदी एंजिनिअर्स शिकून येतील, १४ कॅनडामधून शिकून येतील, १२ ऑस्ट्रेलिआंतून शिकून येतील आणि ९५ पश्चिम जर्मनींतून शिकून येतील. त्याशिवाय रशिआ व पश्चिम जर्मनी ह्यांच्या सहकार्यानें १९६१ सालअखेर १२,००० कुशल कामगार शिकून तयार होतील.

---

**नेपा गिरणीमधील कागद**—मध्यप्रदेशांतील नेपा ह्या कागदाच्या गिरणींतील अधिकाऱ्यांच्या मतानें गिरणींत तयार होणाऱ्या कागदाची दर टनामागें किंमत ७०३ रुपये आहे. हा कागद चांगला पांढरा शुभ्र असून परदेशी कागदाच्या तोडीचा आहे. कागदाचा सध्यांचा विक्रीचा भाव दर टनाला १०० रुपये आहे.

**जर्मनीमधील मोटारींचें उत्पादन**—पश्चिम जर्मनीमधील मोटारींचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे. १९५८ सालीं जर्मनींत १५ लाख मोटारी तयार करण्यांत आल्या. हा आंकडा १९५७ सालांतील उत्पादनापेक्षा ३ लाखांनीं जास्त आहे. पश्चिम जर्मनींत रस्ता-वाहतूक अधिकारी दररोज ३,००० नव्या मोटारवाल्यांना गाडी चालविण्याचे परवाने देत असतात.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )
चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.
ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष
गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
— शाखा —
(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक )
(६) खोपोली ( जि. कुलाबा ).

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,१८५
रिझर्व्हज् रु. १,२५,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ७७,००,०००चे वर

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्टटर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B. } मॅनेजिंग डायरेक्टर्स
नी. ना. क्षीरसागर

## १९५८ मधील औद्योगिक प्रगति

मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्याच्या १९५८ च्या वार्षिक अहवालावरून सदर वर्षांत औद्योगिक उत्पादनांत आणखी वाढ, औद्योगिक उत्पादनक्षमतेंत वाढ, अनेक धंद्यांत नवीन प्रकारचें उत्पादन व सरकारी तसेंच खाजगी क्षेत्रांत महत्त्वाच्या अशा नव्या योजनांस प्रारंभ झाल्याचें दिसून येतें. परकीय चलनाच्या बिकट परिस्थितीमुळें निर्माण झालेल्या अनेक गंभीर प्रश्नांस तोंड देऊनहि ही प्रगति झाली आहे. परकीय चलनाच्या वांटपांत कपात करण्यांत आल्यानें औद्योगिक उत्पादन आणि विकासाचा वाढता वेग टिकवून धरण्यासाठीं आवश्यक अशा कच्च्या मालाची व भांडवली मालाची आयात करण्यासाठी पुरेशी तरतूद करणें अधिकच कठीण झाल्याचें या अहवालांत निदर्शनास आणण्यांत आलें आहे.

जगांतील मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झालेल्या देशांत आर्थिक कार्यक्रम मंदावल्याचा प्रतिकूल परिणाम भारताच्या निर्यात उत्पन्नावर झाल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. तथापि जुलै १९५८ पासून या परिस्थितींत बदल झाला. मागासलेल्या इतर देशांशीं तुलना करतां या वर्षांत भारताची निर्यातविषयक परिस्थिति अधिक चांगली असल्याचें दिसून येतें. परदेशांकडून मागणींत घट होऊनहि चहा, काजू, तंबाखू, अळशीचें तेल यांच्या निर्यातींत वाढ होऊन कांहीं वस्तूंस निर्यातीपासून होणाऱ्या उत्पन्नांत चांगलीच वाढ असल्याचें आढळून येतें.

निरनिराळ्या उद्योगधंद्यांचा विचार करतां या वर्षांत सिमेंट, मशीन टूल्स, शिवण्याचीं यंत्रें, विजेवर चालणारे पंप, डिझेल इंजिनें, इलेक्ट्रिक मोटर्स, विजेचे पंखे, सायकली, सल्फ्यूरिक ॲसिड, कॉस्टिक सोडा, कागद व टायर या धंद्यांच्या उत्पादनांत वाढ, तर सुती कापडाच्या उत्पादनांत घट झाल्याचें दिसून येतें. १९५७ मध्यें ५३१७ दशलक्ष वार सुती कापडाचें उत्पादन झालें होतें. हा आंकडा १९५८ मध्यें ४९०० दशलक्ष वारांवर आला. गिरण्यांचें पुनर्वसन व आधुनिकीकरण करण्यासाठी राष्ट्रीय औद्योगिक विकास कॉर्पोरेशननें या धंद्यास २.३६ कोटी रु. चीं कर्जे मंजूर केलीं. हातमाग विभागाची परिस्थिति या वर्षांत आणखी सुधारली आणि या वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत, मागील वर्षांतील या कालाशीं तुलना करतां, उत्पादन १९ दशलक्ष वारांनीं वाढलें.

कामगार-कलहांमुळें आणि कच्चा माल व सुटे भाग यांच्या आयातीसाठी लागणाऱ्या परकीय चलनांत कपात केल्यामुळें या वर्षांत मोटारधंद्याच्या उत्पादनांत घट झाली आहे.

### औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक वाढला

परकीय चलनाच्या अडचणींस न जुमानतां या वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांचा निर्देशांक, मागील वर्षाच्या या कालांतील १४६.९ वरून १५५.९ वर ( सुती कापडाचा व साखरेचा निर्देशांक वगळल्यास ) गेला.

या वर्षांत सिमेंट, कॉस्टिक सोडा, सोडा ॲश, सल्फ्युरिक ॲसिड, सुपर फॉस्फेट, ऑक्सिजन, रोड रोलर्स व रिफ्रॅक्टरीज या धंद्यांची उत्पादनक्षमता वाढली.

सदर वर्षांत प्रथमतःच इलेक्ट्रो-प्लेटिंग सॉल्टस, ॲक्टिव्हिटेड कार्बन, अवजड औद्योगिक शिवण्याचीं यंत्रें, मर्क्युरी व्हेपर लॅम्प्स इत्यादींचें उत्पादन झालें.

या वर्षांत सरकारी क्षेत्रांतील कारखान्यांचें उत्पादन समाधानकारक असून अनेक कारखान्यांतील विशेषतः दि हिंदुस्थान मशीन टूल्स, पिंपरी येथील दि पेनिसिलीन फॅक्टरी व दिल्ली येथील डी. डी. टी फॅक्टरी यांच्या उत्पादनांत वाढ झाली आहे.

परकीय चलनाच्या अडचणी येऊनहि कांहीं मित्रराष्ट्रांच्या मदतीमुळें या वर्षांत अनेक नव्या मोठ्या योजना सुरू करतां आल्या. हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनची स्थापना ही या वर्षांतील सरकारी क्षेत्रांतील सर्वांत मोठी घटना होय. अमेरिका, इंग्लंड, प. जर्मनी व जपान या देशांकडून मिळालेल्या आर्थिक साह्याचा लाभ योजनेंतील महत्त्वाच्या कार्यक्रमांसच नव्हें तर खाजगी क्षेत्रांतील अनेक उद्योगधंद्यांसहि मिळाला.

छोट्या व कुटीरोद्योगांचा विचार करतां छोट्या उद्योगधंद्यांसाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत संकल्पिलेल्या ११० औद्योगिक वसाहतींपैकी ९.८ कोटी रुपये खर्चाच्या ७२ वसाहतींसाठी सप्टेंबर १९५८ पर्यंत मंजुरी मिळाली असून त्यांपैकी १७ वसाहती पूर्ण झाल्या आहेत. या धंद्यांसाठी दिल्ली राज्यासुद्धां १५ राज्यांत प्रत्येकी एक याप्रमाणें सर्व्हिस इन्स्टिटयूट स्थापन झालीं आहेत.

खादी व ग्रामोद्योग कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सरकारनें खादी व ग्रामोद्योग मंडळास १२.७७ कोटी रुपये मंजूर केले. सरकारी व खाजगी धंद्यांत उत्पादकता मोहीम सुरू करण्यासाठी या वर्षांत एका राष्ट्रीय उत्पादकता मंडळाची स्थापना करण्यांत आली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १० कोटी मण मीठ उत्पादनाचें लक्ष्य या वर्षांत गांठण्यांत आलें.

निर्यातीपासून होणारें उत्पन्न जून १९५८ मध्यें २८ कोटी रुपयांपर्यंत आलें होतें. परंतु त्यानंतर ही परिस्थिति सुधारून सप्टेंबर १९५८ मध्यें ते ५४ कोटी रुपयांवर गेलें. या वर्षांत निर्यात वाढीसाठी सरकारनें अनेक उपाययोजना केल्या. तसेंच कांहीं देशांशीं नव्यानें व्यापार करार केले तर सहा देशांकडे व्यापार व सदिच्छा शिष्टमंडळें पाठविलीं. या वर्षांत भारतानें अनेक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत भाग घेतला, तर 'भारत १९५८' हें पहिलें राष्ट्रीय प्रदर्शन मोठ्या प्रमाणावर भरविलें.

---

## सायकलींच्या आणखी १९ छोट्या कारखान्यांस मंजुरी

चालू आर्थिक वर्षांत सायकलींचे आणखी १९ छोटे कारखाने काढण्यास भारत सरकारनें मंजुरी दिली आहे. या कारखान्यांतून दर वर्षी ८४,५०० सायकली तयार होतील. यांपैकी मद्रास व आंध्र प्रदेश राज्यांत प्रत्येकी ४ कारखाने काढण्यांत येतील. प्रत्येक कारखान्याची उत्पादनशक्ति दरवर्षी २०,००० सायकली असेल. तसेंच म्हैसूर आणि बिहार राज्यांत प्रत्येकी ३, उत्तर प्रदेश राज्यांत २ आणि केरळ, ओरिसा व राजस्थान राज्यांत प्रत्येकी १ कारखाना काढण्यांत येईल. या वर्षांत गोहत्ती येथें दरवर्षी ६०,००० सायकली तयार करू शकणाऱ्या एका मोठ्या कारखान्यास परवाना देण्यांत आला आहे. देशांत सध्यां सायकली तयार करण्याचे ६५ छोटे कारखाने असून त्यांपैकी ५ कारखाने मुंबई राज्यांत आहेत. देशांतील सायकलींचें उत्पादन देशाच्या गरजा भागविण्याचा विचार करतां पुरेसें असून सायकलींची परदेशांत निर्यात करण्याचे प्रयत्न होत आहेत.

## "राष्ट्र कलश" आणि "राज्य कलश"

### शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी सामुहिक बक्षिसें

देशांतील शेतीचें उत्पादन वाढविण्यास उत्तेजन देण्यासाठी जिल्हा आणि राज्यपातळीवर सामुहिक बक्षिसें देण्याची एक योजना सरकारनें मंजूर केली आहे. सुरुवातीस म्हणून चालू वर्षी रब्बी पिकाची उत्पादन-मोहीम चालू असलेल्या नऊ राज्यांपुरतीच (मुंबई राज्य धरून) ही योजना मर्यादित राहील.

या योजनेखाली ज्या जिल्ह्यांचें किंवा राज्यांचें एकूण अन्नधान्य-उत्पादन १५ टक्क्यांपेक्षा अधिक असेल किंवा गेल्या तीन वर्षांतील सरासरी उत्पादनापेक्षा अधिक असेल असेंच जिल्हे आणि राज्यें सदरहू सामुहिक बक्षिसास पात्र ठरतील. बक्षिसास पात्र असलेल्या प्रत्येक जिल्ह्यास आणि राज्यास अनुक्रमें रु. १०,००० आणि रु. ५०,००० याप्रमाणें बक्षिसें देण्यांत येतील. याशिवाय प्रत्येक राज्यांतील सर्वांत अधिक उत्पादन काढणाऱ्या जिल्ह्यास "राज्य कलश" देण्यांत येईल. देशांतील सर्वांत अधिक उत्पादनवाढीचें प्रमाण असलेल्या राज्यास अखिल भारतीय "राष्ट्र कलश" देण्यांत येईल. हीं बक्षिसें चांदीच्या ट्रॉफीजच्या स्वरूपांत देण्यांत येतील आणि त्यावर त्या जिल्ह्याचें किंवा राज्याचें नांव कोरण्यांत येईल. "राष्ट्र कलश" आणि "राज्य कलश" हीं बक्षिसें फिरतीं राहणार असून तीं दर वर्षी अनुक्रमें उत्कृष्ट राज्यास आणि प्रत्येक राज्यांतील उत्कृष्ट जिल्ह्यास देण्यांत येतील.

हीं बक्षिसें राज्य नियोजन मंडळांना आणि जिल्हा विकास / नियोजन समित्यांना देण्यांत येतील. मिळालेल्या रोख बक्षिसाचा उपयोग योग्य त्या विभागांतील समाजाच्या गरजा पुरविण्यासाठी कसा करावा हें सदरहू संस्था ठरवतील. उत्पादन वाढविण्यासाठी ज्या गांवांनीं साहाय्य केलें त्या गांवांनाहि याचा फायदा मिळेल.

"राष्ट्र कलश" आणि "राज्य कलश" तसेंच देण्यांत येणारीं रोख बक्षिसें ह्या सर्वांचें समारंभपूर्वक वितरण करण्यांत येईल आणि कमाल उत्पादन वाढविण्यास ज्यांचें साहाय्य झालें त्यांचा सन्मान करण्यांत येईल. त्याचप्रमाणें उत्पादनवाढीच्या बाबतींत ज्या कामगारांनीं उल्लेखनीय असें कार्य केलें त्यांचा प्रशंसापूर्वक उल्लेख करण्यांत येईल.

राज्यांतील निरनिराळ्या जिल्ह्यांतील तसेंच सबंध राज्यांतील अन्नधान्यउत्पादनांतील वाढ (गेल्या तीन वर्षांतील सरासरी उत्पादनाशीं तुलना करून) किती झाली हें डायरेक्टोरेट ऑफ एकॉनॉमिक ॲण्ड स्टॅटिस्टिक्सकडे पाठविण्यांत येणाऱ्या जिल्हानिहाय उत्पादनाच्या रिपोर्टांवर अवलंबून राहील.

---

### इंडियन पिनल कोडमध्यें दुरुस्ती

इंडियन पिनल कोड दुरुस्त करण्याचें कार्य लॉ-कमिशननें हातीं घेतलें आहे. हे कोड अगदीं अद्ययावत् होण्याच्या दृष्टीनें व त्यामध्यें सुसूत्रता साधण्यासाठीं कशा प्रकारें दुरुस्त्या व फेरबदल करावे याबाबत कमिशन शिफारशी करील. या विषयांत औत्सुक्य असलेल्या व्यक्तींनीं आणि संघटनांनीं आपापलीं मतें कमिशनच्या विचारार्थ जॉइंट सेक्रेटरी, लॉ-कमिशन, ५ जोर बाग, नवी दिल्ली ३, या पत्त्यावर ३१ मे, १९५९ पर्यंत पाठवावींत.

### सिमेंटच्या कारखान्यांच्या उत्पादनांत वाढ

भारतामधील सिमेंटच्या उत्पादनांत वाढ होत आहे. १९५७ सालीं ५६ लाख टन सिमेंटचें उत्पादन करण्यांत आलें तर १९५८ सालीं ६० लाख टनांपेक्षा थोडें अधिक उत्पादन करण्यांत आलें. सिमेंटचे दोन नवे कारखाने प्रथमच उत्पादन करूं लागले. त्यामुळें देशांतील सिमेंटच्या कारखान्यांची संख्या गेल्या सालीं ३१ झाली. त्याशिवाय कांहीं चालू कारखान्यांचा विस्तारहि करण्यांत आला. उत्पादन वाढल्यामुळें सिमेंटच्या देशांतर्गत पुरवठ्यांत बरीच सुधारणा झाली. सिमेंटच्या किंमतीवरील व वाटपावरील कायदेशीर बंधनें रद्द करण्यांत आलेलीं नाहींत. परंतु मध्यवर्ती सरकारच्या सूचनेप्रमाणें राज्य सरकारांनीं सिमेंटसाठी ग्राहकांना घ्यावे लागणारे परवाने रद्द केले आहेत. गेल्या सालीं सिमेंटच्या मागणीला थोडीशी उतरती कळा लागल्याचें दिसून आलें. कारण, लोखंड व पोलादाची कमतरता होती व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कांहीं कामें मंदगतीनें प्रगति करीत होतीं. सिमेंटसाठी परदेशीय बाजारपेठा मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. एकूण २ लाख टन सिमेंट परदेशीं निर्यात करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यांपैकी १,४८,००० टनांच्या निर्यातीचे करार करण्यांत आले असून ७६,००० टन सिमेंट पाठविण्यांतहि आलें आहे. सिमेंटच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री भारतांत तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांना यश आलें तर १९६२ च्या सुमारास सिमेंटच्या कारखान्याची बहुतेक यंत्रसामुग्री देशांतच तयार होऊं लागेल. ॲसबेस्टॉस सिमेंटच्या पत्र्यांचें उत्पादनहि हळूहळू वाढत चाललें आहे. १९५७ सालीं १,५७,५७७ टन पत्र्यांचें उत्पादन करण्यांत आलें होतें. १९५८ सालीं सुमारें १,८४,००० पत्र्यांचें उत्पादन करण्यांत आलें. त्यामुळें त्यांच्या पुरवठ्यांतहि सुधारणा झाली आहे.

---

**जादा सिमेंटचा उपयोग**—भारतामधील सिमेंटच्या कारखान्यांत सिमेंटचा सांठा सांचून राहूं लागला आहे. सिमेंटचा खप चालू ठेवण्यासाठी व वाढविण्यासाठी सरकारनें रस्ताबांधणीचीं कामें मोठ्या प्रमाणावर हातीं घ्यावीं असें सुचविण्यांत येत आहे. तथापि, अशा तऱ्हेचा रस्ता-बांधणीचा कार्यक्रम सरकारजवळील पैशाचा विचार करूनच हातीं घेण्यांत येईल.

**स्वीडनमधील व्यापारी प्रतिनिधी**—स्वीडन व भारत ह्यांच्या दरम्यानची व्यापारी देवघेव वाढविण्याची शक्यता अजमावण्यासाठी स्वीडनच्या व्यापारी प्रतिनिधींचें मंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें आहे. भारतामधील प्रमुख शहरांना मंडळ आपल्या दौऱ्यांत भेट देईल. भारताच्या प्रतिनिधींचें एक मंडळ ह्याच हेतूनें स्वीडनच्या दौऱ्यावर जाण्याचा संभव आहे.

---

**चैनीच्या वस्तूंवर बहिष्कार**—पाकिस्तानांतील पन्नास सुप्रसिद्ध विदुषींनीं, परदेशांतून आणाव्या लागणाऱ्या चैनीच्या वस्तूंवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें आहे. "विदेशी सौंदर्य प्रसाधनें, विदेशी कपडे, प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना, ह्यांचा त्यांनीं त्याग केला आहे. एका सभेंत त्यांनीं वरील प्रकारची घोषणा केली.

**स्वस्त रेडिओ सेट्सवर कमी लायसेन्स फी**—स्वस्त रेडिओ सेट्सवर लायसन्स फी अत्यंत कमी दरानें घेण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. गरीब आणि मध्यम वर्गीयांना रेडिओ बाळगण्यास त्यामुळें उत्तेजन मिळेल.

## काजूंचें उत्पन्न वाढविण्यासाठी बिया फोडण्याच्या कारखान्यांची आवश्यकता

**( अ. नि. कर्वे, दापोली )**

रत्नागिरी जिल्ह्यांत काजूचीं झाडें सर्वत्र आढळतात. या झाडांपासून दरवर्षी काजू–बिया पुष्कळ मिळतात. पण त्या बिया जमवून तसेंच त्या विकून पैसे उभारण्याची सोय नसल्यामुळें लाखों रुपयांचें बीं आज जागच्या जागीं पडून राहतें. कोंकणच्या जनतेला पैशाची गरज आहे. हा प्रांत तुटीचा आहे व परदेशांत काजू–बीला मागणी आहे. या बीच्या मोबदल्यांत मिळणाऱ्या डॉलर व पौंडांची आज राष्ट्राला गरज आहे.

काजूचीं झाडें पसरलेलीं आहेत. त्याचप्रमाणें हर्ड्यांचींहि झाडें सर्वत्र आहेत. झाडांची संख्या मोजली तर काजू झाडांची संख्या जास्त आहे. काजू बियांचें उत्पन्न मिळतें असें प्रत्यक्ष अनुभवानें पटल्यास लोक या झाडाची शेंकडों एकर लागवड सहज करतील. या झाडांना हलकी जमीन चालते. गुरें वगैरे यांचीं पानें खात नाहींत. शिवाय, या झाडाला दक्षिण लागत नाहीं.

हर्डा जमा केला असतां तो मुंबई बाजारांत कमीजास्त भावांत खपतो ही गोष्ट बऱ्याच वर्षांपासून लहानमोठ्या व्यापाऱ्यांना परिचयाची अशी आहे. त्यामुळें शेतकरी वर्गाकडून बाजारांत एकदोन पायली हर्डा जरी आला तर तो तावडतोब रोख मोबदला देऊन घेतला जातो. या व्यवस्थेमुळें हर्डा खेड्यापाड्यांतून घरोघर जमविला जातो. हर्डा जमविण्यास लागणारा वेळ व तो बाजारांत आणावयास लागणारा वेळ हा जमेस धरला तर हर्डा विकून जो मोबदला मिळतो तो मजुरी म्हणून मिळतो; मात्र हर्डा बाजारांत आणला व तो खपला नाहीं असें कधीं होत नाहीं. त्यामुळें दरवर्षी हर्णे बंदरांतून १०।१२ हजार पोतीं हर्डा मुंबईला पाठविला जातो.

हर्डा दोन ते चार आणे पायली या भावानें घेतला जातो. काजू बीला १ रुपयाचे जवळपास भाव असतो. तरी पण काजू बीला दापोली बाजारांत मागणी नाहीं.

याला कारण मुंबईला काजू बीं घेणारे व्यापारी हर्ड्यांच्या व्यापाऱ्यांप्रमाणें नाहींत व काजू बिया भाजून, फोडून त्या बाजारांत पाठविण्यास योग्य करण्याचा कारखाना जवळपास नाहीं. आतांपर्यंत मालवाहतुकीचीं साधनें नव्हतीं. आतां तीं पहिल्यापेक्षा जास्त झालीं आहेत. तरी पण दापोलीचें काजू बी मालवणला पाठविणें अजूनहि खर्चाचें व त्रासाचें आहे.

दापोलीपासून एकदोन मैलांच्या परिसरांतील ओले काजूगर दोन महिने बाजारांत रोज विकले जातात. ६ ते ८ करंड्या माल मुंबईला रोज बोटीवरून पाठविला जातो. एका करंडींत ४० ते ५० रुपयांचा माल असतो. रोज ३०० रुपयांचा माल असा ६० दिवस तरी पाठविला जातो. शेतकऱ्यांना १८,००० रुपये किमान वांटले जातात. दापोलीहून बिया पाठविण्याचें जमविलें गेलें आहे तसें अजून दाभोळ, श्रीवर्धन, जंजिरा, आंजर्ले, येथून ओले गर पाठविण्याचें समजलें नाहीं. काजूचीं झाडें मात्र सर्वत्र आहेत.

काजू झाडांचे बीचें उत्पन्न मिळण्यासाठी तालुक्यांतून बिया फोडण्याचे कारखाने निघणें आवश्यक आहेत. असें झालें असतां इकडील मजुरांना काम मिळेल, बिया जमविल्या जातील आणि काजू कारखानदारांना डॉलर्स राष्ट्राला मिळवून दिल्याचें श्रेय मिळेल.

पद्धतशीर रीतीनें एक क्षेत्रीं ह्या झाडांची लागवड झाल्यास काजू बीचें उत्पन्न चांगलें मिळेल. १९३५ सालीं त्रावणकोर संस्थानचें काजू बीचें उत्पन्न पांचशें हजार टन होतें तें आज तीस हजार टन झालें आहे. आज सिलोन येथें काजूच्या बिया फोडण्याचे १४५ कारखाने असून त्या कारखान्यांत एक लाख लोक काम करीत आहेत. बिया फोडण्याचे कारखाने काढण्यास वेळींच सरकारी व बँकांकडून आर्थिक साह्य मिळाल्यामुळें हें आज घडलें आहे.

सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वी सरकारनें औद्योगिक पाहणी केली होती. त्या माहितीवरून रेवदंडा, बाणकोट, दाभोळ, रत्नागिरी, जैतापूर, मालवण, वेंगुर्ले, जयगड व विजयदुर्ग या बंदरांतून ६९·५ लक्ष रुपयांचा माल बाहेर पाठविला जातो. २०३ लाख रुपयाचा माल आणावा लागतो व १०३ लाख रुपयांचा तोटा आहे. तेव्हां १०३ लाख रुपयांचा अगर जो काय असेल तो तोटा भरून काढण्यास काजू–बीचें उत्पन्न भरपूर मदत करण्यासारखें आज आहे व पुढेंहि राहील.

सहकारी तत्त्वांवर नवीन काजू बीचे कारखाने निघणें जरूर व आवश्यक आहेत. नवीन लागवडी एक–क्षेत्रीं झाल्यास उत्पन्न मिळणें फार सोपें जाईल व उत्पन्न भरपूर मिळेल. सरकारकडून जरूर ती मदत मिळण्यासारखी आहे.

म्हैसूर येथील सरकारी प्रयोगशाळेंत नामवंत तज्ज्ञ श्री. एन्. एल. जैन आणि श्री. गिरिधारीलाल यांनीं काजू फळावर निरनिराळे प्रयोग करून फळांतील खवखव व तुरटपणा नाहींसा केला. रसापासून उत्तम काजू रस पेय तयार केलें. हा काजू रस आरोग्यदृष्ट्या, आज बाजारांत जीं कृत्रिम पेयें विकलीं जातात त्यापेक्षां कितीतरी पटींनें श्रेष्ठ आहे. या गुणांमुळें काजू फळ रस–पेय देशांत तर खपेलच पण परदेशांतहि खूप खपावा असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. फळापासून सायरप, कँडी व जॅम तयार केला आहे. मी स्वतः काजू रस दोन वर्षे तयार करून बाटल्या विकल्या व त्या बाटल्यांना बाजारांत मागणी आहे ती वाढविण्यासारखी आहे.

उसाच्या रसांत साखर वीस टक्के आहे तर काजूरसांत ११ टक्के ग्लुकोज साखर आहे. हा ग्लुकोज मिळण्यासारखा आहे. एका एकरांतील काजू झाडांचीं ९० दिवस फळें जमा केलीं तर तीं वीस टन किंवा जास्त होतील. या वीस टन फळांपासून १० टन रस मिळून त्यापासून ३३ मण २,७०० पौंड ग्लुकोज तयार होतो.

लागवडीचा खर्च व उत्पन्न ह्याचें प्रमाण पाहिल्यास काजू इतकें उत्तम पीक सांपडणें कठीण आहे. वीस हजार झाडांची पद्धतशीर लागवड करून ती १० वर्षे वाढविण्यास वीस हजार रु. खर्च येणार आहे व १० वर्षांनंतर वर्षास २० हजारांपेक्षा जास्त उत्पन्न मिळण्यासारखें आहे. काजूबीचे सालीपासून तेल निघतें. याला देशांत व परदेशांत मागणी आहे.

शिवाय ह्या पिकांचा हंगाम इतर पिकांचा हंगाम सोडून आहे. तसेंच या बाबतींत तयार माल टिकाऊ वगैरे महत्त्वाच्या गोष्टी पण आहेत.

एका झाडापासून हंगामांत किती बिया मिळतात व उत्पन्न

किती मिळूं शकेल याबाबत तज्ज्ञांच्या मतें सरसकट तीन रुपयां-पर्यंत एका झाडापासून फक्त सुकलेल्या काजुबींचे गर विकून उत्पन्न अगदीं कमी मात्र होता त्यावेळींहि मिळतें. आज काजूगर २ ते २॥ रुपये रत्तलप्रमाणें खपत आहेत. एका रत्तलांत ३२० ते ३५० काजूगर असतात. एका झाडाच्या लहान लहान फांद्यांना फळें व बिया १५ ते २० असतात व अशा लहान फांद्या शेंकडोंनीं असतात हें सर्वांना ठाऊक आहेच. संघटित प्रयत्न करून काजू-बिया फोडण्याचे कारखाने सर्वत्र निघणें जरूर आहे. नवीन लागवडी झाल्यास हे कारखाने वाढतील.

दापोली येथें काजुबियांचा कारखाना काढण्याच्या प्रयत्नास यश मिळत आहे. हंगामांत काजूफळांपासून रस, सायरप, जॅम, कॅन्डी तयार करण्याची प्रात्यक्षिक माहिती देण्याचीहि व्यवस्था होत आहे. तेव्हां सर्व शेतकरी बंधूंनीं राष्ट्राच्या उत्पन्नांत भर घालण्याकरितां या काजूझाडांची लागवड करावी. बिया अगर रोपें मिळण्याची व्यवस्थाहि दापोलीला केली आहे.

## नैसर्गिक रबराच्या उत्पादनांत वाढ

भारतांतील नैसर्गिक रबराच्या उत्पादनांत गेल्या १० वर्षांत ६० टक्क्यांनीं वाढ झाली आहे. सप्टेंबर १९५८ च्या अखेर रबराच्या लागवडीखाली एकूण २,७२,५७१ एकर क्षेत्र होतें.

सन १९४८ मधील १५,४२२ टनांवरून १९५८ मध्यें रबराचें उत्पादन २४,३४८ टनांवर गेलें. त्याचप्रमाणें भारतांतील कच्च्या रबराच्या खपांत वाढ होऊन तो १९४८ मधील १९,७१९ टनांवरून १९५८ मध्यें ३४,७५५ टनांवर गेला.

भारतांत रबरापासून निरनिराळया १२० वस्तू तयार करण्यांत येत असून, रबरी मालाच्या बहुतेक बाबतींत भारत आतां जवळ जवळ स्वयंपूर्ण झाला आहे. रबर उद्योगधंद्याचा विकास होत असल्यानें कच्च्या रबराचा खप झपाट्यानें वाढत आहे.

भारतांतील ह्या उद्योगधंद्याच्या गरजा भागविण्यासाठी देशांतील रबराच्या सांठ्यांत भर घालण्यासाठी परदेशांतून नैसर्गिक तसेंच कृत्रिम रबर आयात करावें लागतें. १९५८ मध्यें सुमारें ११,८७८ टन कच्च्या रबराची व ३,५२३ टन कृत्रिम रबराची आयात करण्यांत आली.

अल्पकाळांतच उत्पादन आणि खप यामधील तूट भरून काढण्यासाठी अंदाजीं १५ कोटी रुपये खर्चाचा व दरवर्षी २०,००० टन उत्पादन शक्तीचा एक कृत्रिम रबरकारखाना उभारण्याची एक योजना आहे.

एका सुप्रसिद्ध अमेरिकन फर्मच्या तज्ज्ञांच्या तुकडीनें अशा प्रकारचा कारखाना स्थापन करण्याच्या योजनेची पाहणी करण्यासाठी भारताला नुकतीच भेट दिली होती. ह्या तुकडीचा अहवाल लवकरच हातीं येईल, अशी अपेक्षा आहे.

## हिलरीला चीननें परवानगी नाकारली

तेनसिंगच्या समवेत मौंट एव्हरेस्ट शिखरावर १९५३ मध्यें चढणारा एडमंड हिलरी, ह्यानें इतर कांहीं शिखरांवर आरोहण करण्यासाठी तिबेटमध्यें प्रवेश करण्यास मागितलेली परवानगी चीननें नाकारली आहे.

## एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंडांत जमा झालेल्या रकमेवर ३½% व्याज

एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंडांत जमा झालेल्या रकमेवर (१९५९–६० च्या) ३॥ टक्के व्याज देण्यांत यावें अशी शिफारस एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशनच्या मध्यवर्ती विश्वस्त मंडळानें केली आहे.

दि एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड ॲक्टाची अंमलबजावणी १९५२ पासून सुरू झाली असून हा कायदा आतां ३८ उद्योगधंद्यांस लागू आहे. या धंद्यांतील ६,८४७ कारखान्यांतील सुमारें २४.८ लाख नोकरवर्गास आतां या प्रॉव्हिडंट फंडाचा लाभ मिळत आहे. जानेवारी १९५९ अखेर या फंडांत १३१.४ कोटी रुपये जमा झाले आहेत.

## को. बँकेच्या डिबेंचरांस ४६% ज्यास्त मागणी

बाँबे स्टेट को. लँड मॉर्गेज बँकेनें एक कोटी रुपयांची डिबेंचर्स गेल्या बुधवारीं विक्रीस काढलीं होतीं, ती विक्री सुरू झाल्यावर पांचच मिनिटांत सर्व खपून गेलीं. १,४६,६५,००० रुपयांच्या डिबेंचर्सना मागणी आली. २ लक्ष रुपयांपर्यंच्या मागण्या पूर्णपणें पुऱ्या केल्या जातील. त्यापेक्षा ज्यास्त रकमेचीं डिबेंचर्स मागणारांची ५०% मागणी पुरी होईल. डिबेंचर्सची विक्री बाँबे स्टेट को. बँकेनें अंडरराइट केलीं होतीं. डिबेंचर्सचें मुद्दल व व्याज ह्यांची मुंबई राज्यसरकारनें हमी घेतलेली आहे. विक्रीची किंमत ९९.२५% होती. व्याजाचा दर ४½% आहे.

## म्हैसूरचें स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन

म्हैसूर सरकारनें स्टेट फिनॅन्शिअल ऑर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. त्याचें अधिकृत भांडवल २ कोटी रुपये असून तें पूर्ण भरणा झालेल्या प्रत्येकीं १०० रुपयांच्या २ लक्ष भागांत विभागलेलें आहे. त्यांपैकी १ कोटी रुपयांचे भाग तूर्त विक्रीस काढले जातील. त्यांची वांटणी खालीलप्रमाणें होईल:—म्हैसूर राज्य सरकार ३६,००० भाग, रिझर्व्ह बँक १५,००० भाग, शेड्यूल्ड बँका, विमा कंपन्या, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स व सहकारी बँका ४४,००० भाग आणि इतर ५,००० भाग.

## पाकिस्तानच्या बजेटांत भारताच्या कर्जफेडीची तरतूद नाहीं

पाकिस्ताननें फाळणीच्या पूर्वीच्या ३०० कोटी रुपयांच्या कर्जाचा बोजा पत्करला होता व भारताला ती रक्कम देण्याची पाकिस्तान टाळाटाळ करीत असलें तरी त्याच्या वार्षिक अंदाज-पत्रकांत कर्जफेडीची थोडीशी तरतूद केली जाई. गेल्या वर्षी अशा रीतीनें ५ कोटि रुपयांची तरतूद होती. आतांच्या अंदाज-पत्रकांत ही तरतूद गाळण्यांत आली आहे. पाकिस्तानचें ग्रेट ब्रिटनचें देणें फेडण्यासाठी मात्र तरतूद आहे.

जेट विमानांसाठी एअर होस्टेस—एअर इंडिया इंटर नॅशनलची जेट विमानें लवकरच प्रवाशांची वहातूक सुरू करतील. त्यांत काम करण्यासाठी एक जर्मन, तीन जपानी व दोन चिनी मुलींना एअर होस्टेसचें काम मुंबई येथें शिकविण्यांत येत आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.